# दैनिक अक्षराज


अचूक वेध,अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ९३
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शुक्रवार, दि.१५ नोव्हेंबर २०२४







## महायुतीचीच सत्ता येणार : पंतप्रधानांचा विश्वास

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, मुंबई :** महाविकास आघाडीचे तुष्टीकरणाचे धोरण असून ते सत्तेवर आल्यास अनुसूचित जाती-जमाती, आदिवासी व ओबीसींचे आरक्षण काढून घेतील, असे प्रतिपादन करीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुंबईकरांना महायुती सरकारच्या शपथविधीचे सोहळ्याचे आमंत्रण द्यायला मी आलो आहे, असे गुरुवारी शिवाजीपार्क येथे महायुतीच्या झालेल्या प्रचारसभेत सांगितले. ' एक है, तो सेफ है ', हा नारा पुन्हा देत महाराष्ट्रातील जनता हरियाणाप्रमाणेच महाविकास आघाडीला चोख प्रत्युत्तर देईल, असा विश्वास मोदी यांनी व्यक्त केला.

काँग्रेसच्या राजवटीत मुंबईसह देशात अतिरेकी हल्ले, रेल्वेगाड्या, बसगाड्या व अन्य सार्वजनिक ठिकाणी बाँबस्फोट होत होते. त्यावेळी मुंबईकरांवर भीतीचे सावट होते. पण महायुती सरकारच्या काळात अतिरेकी कारवायांना पायबंद बसला आहे. आमच्या सरकारच्या काळात जर अतिरेकी कारवाया करण्याचा प्रयत्न झाला, तर मोदी सरकार अतिरेक्यांना पाताळातूनही खणून काढेल, हे त्यांच्या म्होरक्यांना माहीत आहे. त्यामुळे मुंबईसह देशभरातील नागरिकांमध्ये आज सुरक्षिततेचे वातावरण असल्याचे मोदी यांनी सांगितले. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुहृदयसम्राट असा उल्लेख



करुन त्यांच्याबद्दल प्रशंसोद्गार काढून दाखवावेत, त्यांना बाळासाहेबांचे आशिर्वाद मिळून शांत झोप लागेल, असे मोदी यांनी नमूद केले.

**मविआकडून तुष्टीकरण**

मोदी म्हणाले, मविआ तुष्टीकरणाचे गुलाम असून जनतेचा अपमान करीत आहेत. मतांसाठी भगवा आतंकवाद असा शब्दप्रयोग त्यांनी केला. अयोध्येत भव्य राममंदिराच्या उभारणीला विरोध केला, जम्मू व काश्मीरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान लागू करण्यास त्यांनी विरोध केला. राजकारणात मुद्द्यांना विरोध समजू शकतो. पण प्रत्येक राजकीय पक्षाने देशहिताचा मुद्दा असेल, तेव्हा त्याला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे.

**'काँग्रेसच्या खोट्या प्रचारात अडकू नका'**

पनवेल : काँग्रेसच्या खोट्या प्रचारात अडकलात तर ते समाजात भांडण लावून समाजाला वेगळे करण्याचे काम करतील आणि यातूनच ते सत्तेवर येण्याची संधी शोधतील. तसेच राहुल गांधी सांगतात की, त्यांची सत्ता आल्यावर आरक्षण संपवणार. त्यामुळे काँग्रेसच्या खोट्या प्रचारात अडकू नका, असे मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी खारघर येथील सभेत व्यक्त केले.

कोकण विभागातील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी गुरुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खारघर येथील सेंट्रल पार्कजवळील मैदानात जाहीर सभा घेतली. भाजप आणि महायुती आहे तर राज्याचे प्रगती असे सांगत रायगड जिल्ह्याचा विकास होण्यापासून कोणी रोखू शकत नाही, असेही मोदी म्हणाले. दि.बा पाटील यांचे योगदान, त्याग, बलिदान आपल्याला विसरता येणार नसून त्यांच्यामुळे आपल्याला राज्य पुढे नेण्याची नवीन ऊर्जा मिळते, असेही त्यांनी सांगितले.

**मुंबईत अनेक प्रकल्प**

मुंबई शहराचा चेहरामोहरा महायुती सरकारने बदलला असून रेल्वे, मेट्रो, अटल सेतू आणि अनेक पायाभूत सुविधांची लाखो कोटी रुपयांची कामे सुरु आहेत. महाविकास आघाडी सरकारने जनहिताच्या प्रकल्पांमध्येही अडथळे आणले. महायुती सरकार विकासाचे राजकारण करीत असून मुंबईसह राज्याचा विकास साधायचा असेल, तर महायुतीला पुन्हा निवडून देवून मला जनतेची सेवा करण्याची पुन्हा संधी द्यावी, असे आवाहन मोदी यांनी मुंबईकरांना केले. निकालानंतर आठ-दहा दिवसांमध्ये सरकार स्थापन होईल आणि या सरकारच्या शपथविधी सोहळ्याचे आमंत्रण द्यायलाच मी आलो असल्याचे मोदी यांनी सांगितले.

**मतांचे धर्मयुद्ध करण्याची आता वेळ- फडणवीस**

महायुती सरकारने केलेल्या कामांच्या आधारे आम्ही जनतेकडे मत मागत आहोत. पण विरोधक लांगूलचालनातून मते मागत आहेत. राज्यात २०१२-२४ या काळात झालेल्या दंगलींमधील मुस्लिम आरोपींना सोडून देण्याची उलेमांची मागणी आहे. या मागणीसह आघाडीने त्यांच्या १७ मागण्या मान्य केल्या आहेत. ते जर ' व्होट जिहाद ' करणार असतील, तर आपल्याला ' मतांचे धर्मयुद्ध ' करण्याची वेळ आता आली आहे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## गद्दार शंभूराज देसाई यांना घरी बसवा : सुषमा अंधारे

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१४, पाटण :** भाजपचा सुत्रधार स्वतः नेते निर्माण करत नाही तर दुसऱ्यांचे गट फोडणे आणि नेते पळवणे हे यांना जमते. फडणवीस यांनी माणसं चोरली, पळवली, गद्दार केली. या गद्दारीत सगळ्यात पहिला गद्दार शंभूराज देसाई होते त्यांना घरी बसवा

उध्दव ठाकरे यांनी आजारपणात कारभार एकनाथ शिंदे कडे दिला. कावळ्याला दिला कारभार त्याने.. भरवला दरबार.. अशा गद्दार लोकांना सांगावे लागेल ही गद्दारी महाराष्ट्रात चालत नाही. पाटण विधानसभा मतदारसंघात लागलेला गद्दारीचा डाग पुसून काढण्यासाठी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे उमेदवार हर्षद कदम यांना प्रचंड मतांनी विजयी करा. असे ढेबेवाडी येथे आयोजित शिवसेना ठाकरे गटाच्या प्रचारार्थ शिवसेनेच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी बोलताना सांगितले.

यावेळी व्यासपीठावर महा आघाडी शिवसेना उध्दव बा.ठाकरे गटाचे अधिकृत उमेदवार भानुप्रताप उर्फ हर्षद कदम, राष्ट्रीय काँग्रेसचे जिल्हासरचिटणीस



नरेश देसाई, पाटण तालुका शिवसेना प्रमुख सुरेश (नाना) पाटील, सचिन आचरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

आपल्या भाषणात सुषमा अंधारे पुढे म्हणाल्या शेतमालाला भाव नाही, रोजगार नाही, विकास कामांची प्रगती नाही. कशाचे गंध नसलेले मंत्री झाले. उत्पादन शुल्कचा खात्याच्या मंत्र्यांने अंमली पदार्थांवरती नियंत्रण ठेवायचे असते. शंभुराज देसाई हे मंत्री स्वतः अधिवेशनाच्या चालू विधीमंडळात तंबाखू- सुपारी खातात हे अखखा महाराष्ट्रातील जनतेने टिव्हीवर पाहिले आहे. खात्याचा गैरवापर करून दारुचे लायसन्स देऊन अफाट माया जमा करणारे शंभुराज देसाई आहेत. लोक बरबाद होऊदे परंतु देसाईंचे घर भरले पाहिजे. एवढाच हेतू त्यांचा आहे. राज्यात बटन कुठे ही दाबले तरी करंट इकडे लागतो. पुण्यात शंभरदिडशे डान्सबार आहेत. शंभूराज देसाई यांच्या आशीर्वादाने चालतात. मला बोलतात सुषमा अंधारे यांनी माझी इज्जत घालवली. परंतु तुम्हाला इज्जत होती का..? तुमची आब्रु महाराष्ट्राच्या वेशीवर टांगली गेली आहे. ते पहा मग मला अब्रुनुकसानीची नोटिसा पाठवा. मी मिंदी गद्दार नाही कि तुमच्या सारखी झुकणारी नाही. लोकनेते बाळासाहेब देसाई हे राज्याचे कणखर नेते होते यांच्या सारख्यांच्या पोटाला गद्दार अवलाद जन्माला येते. हा लागलेला डाग पुसून काढण्यासाठी नवीन नेतृत्वाला संधी दिली पाहिजे.

सत्यजितसिंह पाटणकर यांच्या कडून आम्हाला अपेक्षा होत्या. परंतु ते लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहेत. पाटणकरांनी जबाबदारीने बोलले आणि वागले पाहिजे. महाविकास आघाडीचा धर्म त्यांनी पाळाला नाही. आमचा आणि सत्यजितसिंह पाटणकर यांचा कसलाही संबंध नाही. ते बंडखोरीचा आव आणत आहेत ही बंडखोरी नसून शंभूराज देसाई यांच्या सोबत आहेत. पवारांना बदनाम करण्याचा प्रयत्न ते करत आहेत. मतदारसंघात संभ्रम निर्माण करु नये. आसे सांगताना तालुक्यातील लोक मुंबई ला स्थायिक झाली कारण इथं रोजगारच नाही. इथं तर टक्केवारी आणि दलालीची राजकारण आलं. येथे हुजरेगिरी मुजरेगिरींचा कंपु निर्माण केला आहे. जो हो.. ला हो.. बोलतो त्याला काम दिले जाते. शंभूराज देसाई यांची दबावशाही, हकूमशाही सुरु आहे. पोलिस स्टेशन ही दबावाखाली आहे परंतु या बलाढ्य हत्ती समोर कोवळ्या वयाचा मुलगा लढत आहे. सर्वसामान्य लोकांना ओळख देणे ही शिवसेनेची खासियत आहे.

## पुरुषोत्तम जाधव यांनी प्रचार दरम्यान कार्यकर्त्यांसह घेतले खर्डा भाकरीचे रानभोजन

**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**दि.१४, खंडाळा (सातारा) :** विधानसभा निवडणुकीचा धुरळा राज्यभरात सर्वत्रच पाहायला मिळतोय,अनेक उमेदवारांच्या गाड्यांचा ताफा,जेवणावळी सर्वत्रच पाहायला मिळतेय,मात्र रखरखत्या उन्हात कमीत कमी यंत्रणेवर वाई खंडाळा महाबळेश्वर विधानसभा मतदारसंघाचे अपक्ष उमेदवार पुरुषोत्तम जाधव यांनी प्रचाराची जोरदार भिंगरी सुरू केली आहे. पुरुषोत्तम जाधव अपक्ष उमेदवार असल्याने त्यांना सर्वच पक्षातून पाठिंबा देखील दिवसेंदिवस वाढत आहे त्यांनी प्रत्यक्ष मतदारांच्या गाठीभेटीवर भर दिल्याने सकाळी ८ वाजले पासून त्यांच्या प्रचाराला सुरुवात होते.

निवडणूक आले की सत्तेत असलेले नेते पैशाचा



प्रचंड वापर करून निवडणुका लढवितांना आपण पाहतो,मात्र सामान्य कुटुंबातील व्यक्ती असलेल्या पुरुषोत्तम जाधव यांनी अत्यंत साध्या पद्धतीने प्रचार यंत्रणा सुरू केली आहे.

आज वाई पूर्व भागात प्रचार दिवसभर सुरू होता. सुरूर,कवठे,अनवडी,शिरगाव किकली या परिसरात प्रचार सुरू असतानाच पुरुषोत्तम जाधव व त्यांच्या कार्यकर्त्यांनी घरातूनच आणलेल्या भाकरी कांदा,चटणी व मिरचीच्या झणझणीत खर्ड्यावर ताव मारून पुढच्या प्रचाराला आगेकूच केली.

वाई पूर्व भागात पुरुषोत्तम जाधव यांना गावोगावी प्रचंड प्रतिसाद मिळत असून मतदारांच्या व्यथा ते प्रत्यक्ष पारावर गप्पा मारून महिला व नागरिकांशी चर्चा करून जाणून घेत आहेत.अवास्तव खर्चाला फाटा देऊन पुरुषोत्तम जाधव यांनी सुरू केलेली आगळीवेगळी प्रचार यंत्रणा म्हणजे भांडवलदारासमोर सामान्य कुटुंबातील व्यक्ती अशी ही लढाई पाहायला मिळणार आहे.

## प्रशांत ठाकूर यांच्या प्रचारार्थ मोदींची विजय संकल्प सभा संपन्न




**अक्षराज : दत्तात्रय शिंदे/ अमोल सूर्यवंशी**

**दि.१४, खारघर (नवी मुंबई) :** गुरुवार, दिनांक १४ नोव्हेंबर २०२४ रोजी पनवेल

विधानसभा उमेदवार प्रशांत ठाकूर यांच्या प्रचारार्थ खारघर सेंटर पार्क येथे संकल्प विजय सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपस्थिती दिसून आली. छत्रपती शिवाजी महाराज, लोकनेते दि.बा. पाटील, लहुजी वस्ताद यांना वंदन करून नवी मुंबई तसेच पनवेल तालुक्यातील जनतेला महाविकास आघाडी बद्दल टीका टिपणीसह भाजपा ने केलेल्या कामाचा अहवाल देत. मार्गदर्शन करून प्रशांत ठाकूर यांना भरघोस मतांनी निवडून देण्यासाठी जनतेला आव्हान केले. यावेळी मोठ्या प्रमाणात जनतेने सभेला प्रतिसाद दिला.

## महाविकास आघाडीचे सरकार आले तर बाळासाहेब थोरात मुख्यमंत्री होणार का ?



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, शिर्डी (अहिल्यानगर) :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडी आणि महायुती या दोन्ही गटातील नेत्यांमध्ये आरोप प्रत्यारोपांच्या फेऱ्या सुरू आहेत. नेतेमंडळी एकमेकांवर आरोप करत आहेत. दोन्ही गटांकडून आपापल्या उमेदवारांसाठी जोरदार मोर्चे बांधणी केली जात आहे. खरंतर यंदाची विधानसभा निवडणूक विशेष लक्षवेधी ठरत आहे, कारण असे की राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना हे दोन प्रमुख पक्ष फुटल्यानंतर पहिल्यांदाच विधानसभेच्या निवडणुका होत आहेत. महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही गटात जागा वाटपावेळी मुख्यमंत्री पदाबाबत देखील मोठ्या प्रमाणात गदारोळ पाहायला मिळाला. महाविकास आघाडी बाबत बोलायचं झालं तर शिवसेना ठाकरे गटाने सातत्याने आघाडीने मुख्यमंत्री पदाचा चेहरा जाहीर करावा आम्ही त्याला पाठिंबा देऊ असे म्हणत मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करण्यासाठी दबाव बनवण्याचा प्रयत्न केला. ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी उद्धव ठाकरे हेच मुख्यमंत्रीपदासाठी योग्य आहेत असे वारंवार सांगितले. मात्र राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट आणि काँग्रेस हे सरकार आल्यानंतरच मुख्यमंत्री पदाचा चेहरा जाहीर करण्याच्या बाजूने आहेत. अशातच मात्र आता शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शरद पवार याचे एक विधान चर्चेत आले आहे. या विधानामुळे महाविकास आघाडीचा मुख्यमंत्री पदाचा चेहरा कोण ? या शांत झालेल्या चर्चांना पुन्हा ऊत येण्याची शक्यता आहे. शिर्डी विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रभावती घोगरे यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत शरद पवार यांनी एक मोठे विधान केले. त्यांनी काँग्रेस उमेदवार प्रभावती घोगरे यांच्या प्रचाराच्या सभेत बोलताना बाळासाहेब थोरातांना आता निर्णयाचे अधिकार घ्यायला हवेत. त्यांच्या हातात राज्य दिले तर अनेक प्रश्न सुटण्यास मदत होईल,असे मत व्यक्त केले. पवार म्हणाले की,शेतीचे प्रश्न सोडवायचे असतील तर थोरातांना तुम्ही आता निर्णयाचे अधिकार द्यायला हवेत. आता मी काही विधानसभेत जाणार नाही. थोरात तेथे आहेत. राज्याचा कृषीमंत्री म्हणून देशातील इतर कृषीमंत्र्यांच्या तुलनेत त्यांनी सर्वोत्तम काम केले. पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव तालुक्यातही शरद पवार यांच्या सभा झाल्या. ज्यांनी साथ सोडली त्यांना शिक्षा झालीच पाहिजे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. विशेष बाब म्हणजे घोगरे यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत संगमनेरचे बाळासाहेब थोरात हे सुद्धा उपस्थित होते. यावेळी बाळासाहेब थोरात यांनी विखे यांच्यावर निशाणा साधला. थोरात यांनी, प्रभावती घोगरे व माझ्यावर लवकरच भाषणबंदी येणार असल्याची शक्यता आहे. तशा हालचाली निवडणूक आयोगाकडे सुरू झाल्या आहेत. या भागात गुलामीचे राजकारण चालू आहे, असं म्हणत नाव न घेता विखे पाटील यांच्यावर टीका केली.

## बारड येथे आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सभा

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१५, मुदखेड (नांदेड) :** महायुतीच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ मुदखेड तालुक्यातील बारड येथे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आज दि.१५ नोव्हेंबर रोजी सभा आयोजित करण्यात आली आहे. भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे उमेदवार १६ नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीचे उमेदवार डॉ संतुकराव हंबर्डे व ८५ भोकर विधानसभेचे अधिकृत उमेदवार श्रीजयाताई चव्हाण यांच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री आज दिनांक १५ नोव्हेंबर रोजी मुदखेड तालुक्यातील बारड येथे सकाळी ११:४५ वाजता बारड येथे सभा होणार आहे. यावेळी माजी मुख्यमंत्री खा अशोकराव चव्हाण, अण्णाभाऊ साठे यांचे नातू सचिनभाऊ साठे माजी आमदार अमिताताई चव्हाण लोकसभा पोटनिवडणुकीचे उमेदवार डॉ संतुकराव हंबर्डे भोकर विधानसभा मतदारसंघ उमेदवार अँड श्रीजयाताई चव्हाण भाजपचे जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख, जिल्हा महामंत्री प्रविण गायकवाड यांची उपस्थित राहणार आहेत या सभेला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन बाळासाहेब देशमुख बारडकर व भाजप तालुका अध्यक्ष बालाजी खटींग शिवसेना तालुकाप्रमुख संजय कुरे या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.




## क्रांतिकारकांचे गुरू

१४ नोव्हेंबर, स्वातंत्र्य संग्रामातील एक जहाल क्रांतिकारक तसेच क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे यांची जयंती. भारतमातेला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी लाखो ज्ञात अज्ञात क्रांतिकारकांनी हौतात्म्य पत्करले त्यात वस्ताद लहुजी साळवे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. वस्ताद लहुजी साळवे यांनी भारतमातेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जे महान कार्य केले त्या कार्याची नोंद भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सुवर्ण अक्षरांनी घ्यायला हवी होती मात्र दुर्दैवाने त्यांच्या कार्याची दखल इतिहासकरांनी घेतली नाही म्हणूनच त्यांच्या कार्याविषयी देशातील खूपच कमी लोकांना माहिती आहे. वस्ताद लहुजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे ( राऊत ) तर आईचे नाव विठाबाई असे होते. लहुजी साळवे यांचा जन्म शूरवीरांच्या घरात झाला. त्यांचे खापर पणजोबांवर शिवाजी महाराजांनी पुरंदर किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी दिली होती. त्यांचे वडील राघोजी साळवे हे दुसऱ्या बाजीरावाच्या काळात शिकारखाना व शस्त्रगाराचे प्रमुख होते. लहुजींचे घराणे शूरवीर, लढवय्ये असल्याने लहुजीने देखील शूर बनावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती म्हणूनच त्यांनी लहुजींना लहानपणापासूनच शस्त्रांची आणि युद्ध कलेची तालीम दिली. त्यामुळे लहुजी घोडेस्वारी करणे, दांडपट्टा फिरवणे, भालाफेक करणे, बंदूक चालवणे, तोफगोळे फेकणे, गनिमीकावा करणे, शत्रूंची गुप्त माहिती गोळा करणे या युद्ध कलांत पारंगत झाले. ५ नोव्हेंबर १८९७ रोजी पेशव्यांचे इंग्रजांसोबत घनघोर युद्ध सुरू झाले. या युद्धात राघोजींसोबत तरुण लहुजीही सहभागी झाले. या युद्धात राघोजी लहुजी या बापलेकांनी प्रयत्नांची शर्थ केली मात्र या युद्धात राघोजींना वीरमरण आले. या युद्धात पेशव्यांचा पराभव झाला. वडिलांना वीरगती प्राप्त झाल्यावर लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्य प्राप्तीची ज्वाला भडकली. भारतमातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी राघोजी साळवे शाहिद झाले त्या ठिकाणीच लहुजींनी १७ नोव्हेंबर १८१७ ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण करतना मरेन तर देशासाठी आणि जगेन तर देशासाठी अशी शपथ घेतली. इंग्रजांशी लढायचे असेल तर त्यासाठी जहालच व्हावे लागेल हे ओळखून त्यांनी तरुणांना जागृत केले. लहुजी साळवे यांनी पुण्यातील मुलांना युद्ध कलेचे शिक्षण देण्यासाठी पुण्यतिल रास्ता पेठेत देशातील पहिले तालीम युद्ध कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रात सर्व समाजातील तरुण सहभागी झाले. १८३९ साली इंग्रजांनी सातारचे छत्रपती प्रतापसिंह यांना गादीवरून हटवले. छत्रपती प्रतापसिंह यांना पदच्युत केल्याने तरुणांमध्ये इंग्रजांविरुद्ध चीड निर्माण झाली. याचा वचपा काढण्यासाठी तात्या टोपे, नानासाहेब पेशवे यांनी महाराष्ट्रात तर उत्तरेत रंगोबापू यांनी लहुजींच्या मदतीने इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. १२ जून १८५७ ही बंडाची तारीख निश्चित करण्यात आली. मात्र बंडाची कुणकुण इंग्रजांना लागली व त्यांनी लहुजींसह अनेक क्रांतिकारकांना पकडले मात्र त्यामुळे इतर क्रांतिकारक चिडले व त्यांनी पुरंदरच्या मामलेदारांना ठार मारले. मामलेदारांच्या हत्येला जबाबदार ठरवून इंग्रजांनी कनय्या मांग व धर्मा मांग यांना तोफेच्या तोंडी दिले हे दोघेही लहुजीचे शिष्य होते. याच हत्येला जबाबदार ठरवून आणखी काही क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. या क्रांतीकारकांना लहुजी साळवे यांनीच प्रशिक्षण दिले असा संशय असल्याने इंग्रजांनी लहुजी साळवे यांना अटक करण्यासाठी त्यांच्या पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा लावला. पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी लहुजी साळवे हे वेषांतर करून भ्रमंती करू लागले या काळात त्यांनी सातारा, पन्हाळा या ठिकाणच्या दुर्गम भागात प्रशिक्षण केंद्र उभारली. या प्रशिक्षण केंद्रातून त्यांनी अनेक क्रांतिकारक तयार केले. १७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्यातील संगमपूरच्या परिसरात एका झोपडीवजा घरात लहुजींची प्राणज्योत मालवली आणि एका महान क्रांतीपर्वाचा शेवट झाला. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी वस्ताद लहुजी साळवे शेवटच्या श्वासापर्यंत लढले आणि आपल्या सारखेच हजारो जहाल क्रांतिकारक निर्माण केले म्हणूनच त्यांना क्रांतिकरांचे गुरू असे म्हणतात. आज त्यांचा स्मृतिदिन मात्र आजही त्यांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला नाही हे आपले दुर्दैव. अर्थात याला आपले इतिहासकार देखील तितकेच जबाबदार आहेत त्यांनी वस्ताद लहुजी साळवे यांचे कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहचवले नाही. वस्ताद लहुजी साळवे यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# बालपण हरवलेला 'बालदिन'

**'लहानपण देगा देवा । मुंगी साखरेचा रवा ।।**
**ऐरावत रत्न थोर । त्यासी अंकुशाचा मार ।।**
**याचे अंगी मोठेपण । तया यातना कठीण ।।'**

या एका अभंगात संत तुकाराम महाराजांनी लहानपणाची थोरवी वर्णिली आहे. अंगात मोठेपण आले कि त्याला अनेक समस्यांना सामोरे जावे यासाठी कोणतेही दायित्व नसलेले लहानपणच बरे हे त्याकाळी तुकाराम महाराजांनी सांगितले असले, तरी आजमितीला लहानपणच अधिक यातनादायी झाले आहे. देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या जन्मदिनाप्रीत्यर्थ साजरा होणारा बालदिन दरवर्षी शाळांमध्ये उत्साहाने साजरा होतो. बालकांच्या हक्काचा वर्षातील हा एकमेव दिवस असला,तरी आजच्या लहान मुलांची स्थिती पाहिल्यास त्यांचे बालपण कुठेतरी हरवत चालल्याचे लक्षात येते. विज्ञानाने जग प्रगतशील झाले असे म्हणतात; मात्र याच विज्ञानाने लाभलेल्या मोबाईल, इंटरनेट, व्हिडीओ गेम, केबल टीव्ही यांसारख्या साधनांनी मुलांना वेगळ्याच जगात नेले. मित्र मैत्रिणींसोबत मैदानी खेळ खेळण्याच्या, पालकांशी गप्पा मारून आपले विचार प्रकट करण्याच्या वयात मुले मोबाईलच्या आभासी जगामध्ये रमताना दिसत आहेत.

ज्यामुळे हल्ली बालवयातच मुलांना नेत्रविकार, मनोविकार जडू लागले आहेत. देशासाठी प्राणाचे बलिदान करणारे क्रांतिकारक, समाजसुधारक, राष्ट्रपुरुष हे आजच्या मुलांचे आदर्श नसून कार्टून जगतातील खोटी पात्रे मुलांना आपले आदर्श वाटू लागले आहेत. मुलांचे भवितव्य घडवण्याच्या हेतूने नोकरी व्यवसायासाठी घराबाहेर पडणारे आई बाबा मुलांना उमलत्या वयातच वेळ देत नसल्याने मुलांमधील त्यांच्याविषयीची प्रेम आणि आपुलकी कुठेतरी उणावू लागली आहे. त्यामुळे हल्लीची मुले पालकांना किंवा मोठ्यांना उलट उत्तरे देताना जराही विचार करत नाहीत. सातत्याने हिंस्त्र व्हिडीओ गेम्स, रिल्स पाहून लहान मुलांमध्येही मनोविकार, दोष वाढू लागले आहेत.

सध्याच्या स्पर्धात्मक जगात आपल्या पाल्याचा निभाव लागावा म्हणून पालक त्यांना शाळेसोबत कोचिंग क्लासेस, प्रायव्हेट ट्युशन्सना घालत आहेत. हे कमी म्हणून कि काय त्याच्या जोडीला जिम्नॅस्टिक, स्पोर्ट्स, सिंगिंग, डान्स क्लासेसनाही मुलांना जावे लागत आहे. या सर्वांच्या ओझ्याखाली बालवयातच मुले राब-राब राबत आहेत. पालकांच्या अपेक्षांचे ओझे पेलताना मुलांचे बालपण मात्र हरवत चालले आहे. गेल्या काही वर्षांत लहान मुलांवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्येही कमालीची वाढ झाली आहे. या सर्वांचा परिणाम म्हणून बाल गुन्हेगारीचा आलेखही दिवसागणिक चढू लागला आहे. १०-१२ वर्षांची लहान मुले सुद्धा काही मनाविरुद्ध घडले, घरात कोणी उलट बोलले, अपमान केला किंवा परीक्षेत कमी गुण मिळाले म्हणून आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेऊ लागले आहेत. बालमजूर प्रतिबंधक कायदा अस्तित्वात असला तरी आज कितीतरी किराणा मालाच्या दुकानांत, चहाच्या टपरीवर, उपहारगृहांमध्ये, छोट्या कारखान्यांमध्ये लहान मुले राबताना दिसतात. सिग्नलवर, रेल्वे आणि बसेसमध्ये लहान मुलांकडून भीक मागून घेणे हाही एक व्यवसाय झाला आहे. मुलांचे हरवत चाललेले बालपण त्यांना पुन्हा मिळवून देण्याचे दायित्व नक्की कोणाचे ? पालकांचे, समाजाचे कि सरकारचे ?


**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

# वाघाहून शूराची औलाद: लहुजी वस्ताद !

छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात लहुजींचे पूर्वज पराक्रम गाजवीत. साळवे घराणे सशस्त्र विद्येमध्ये निपुण व तरबेज होते. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या कार्यकाळात लहूजींच्या पूर्वजांना महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपविल्या होत्या. छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या कार्यकाळात साळवे घराण्याची योग्यता ओळखून पुरंदर किल्ल्याच्या सरंक्षणाची जबाबदारी लहुजी साळवे यांच्या आजोबांकडे सोपवली होती. पुरंदर किल्ल्याच्या सरंक्षणासाठी साळवे घराण्यातील अनेक वीरपुरुषांनी आपल्या प्राणांची आहुती दिली होती. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरींमुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी लहुजींच्या पूर्वजांना राऊत या पदवीने गौरविले होते.

वस्ताद लहुजी राघोजी साळवे हे खरेतर लहुजी वस्ताद नावाने प्रसिद्ध आहेत. त्यांचा जन्म दि.१४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावातील एका कुटुंबात झाला. मातंग समाजात जन्माला आलेल्या लहूजींना युद्धकलेचे प्रशिक्षण त्यांच्या घरातील वीर पुरुषांकडून मिळाले होते. लहूजींच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे व आईचे नाव विठाबाई होते. लहूजी साळवे यांचे वडील राघोजी साळवे अतिशय पराकर्मी पुरुष होते. युद्ध कलेमध्ये त्यांचा कोणीही हात धरू शकत नसे. वाघाबरोबर लढाई करण्याच्या पराक्रमामुळे लहुजी साळवे यांचे वडील राघोजी साळवे त्याकाळी प्रसिद्ध होते. एकदा त्यांनी वाघाबरोबर युद्ध केले आणि जिवंत वाघाला खांद्यावर घेऊन पेशव्यांच्या राजदरबारी सादर केले होते. असे त्यांनी आपल्या प्रचंड शक्तीचे प्रदर्शन केले होते.

पुढे दि.५ नोव्हेंबर १८१७ला पेशव्यांचे इंग्रजांसोबत खडकी येथे तुंबळ युद्ध झाले. तब्बल १२ दिवसांपर्यंत राघोजी व २३ वर्षे वयाच्या लहुजी यांनी आपल्या मावळ्यांना सोबत घेऊन इंग्रजांविरुद्ध निकराचा लढा दिला. लहुजींचे वडील राघोजी साळवे वाऱ्याच्या वेगाप्रमाणे शत्रूवर तुटून पडले होते. ते तलवारीचे सपासप वार करत शत्रुंना जमिनीवर लोळवत होते. अखेर या संकटातून बाहेर पडण्यासाठी घाबरलेल्या इंग्रजांनी एकत्रित वार करून राघोजींना धारातीर्थी पाडले. राघोजी या युद्धात इंग्रजांच्या हातून लहुजींच्या समोरच शहीद झाले. त्यावेळी पेशव्यांचा पराभव झाला. पुढे इ.स.१८१८मध्ये मराठा साम्राज्याचा भगवा ध्वज शनिवारवाड्यावरून हटवून तेथे इंग्रजांचा युनियन जॅक फडकला. या पराभवाने लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्यप्राप्तीची ज्वाला भडकली. स्वातंत्र्यप्रेम, देशभक्ती, देशप्रेम यांनी झपाटलेले लहुजी आपल्या वडिलांच्या मृत्यूच्या दुःखातून सावरले. आपल्या वडिलांना आपल्या डोळ्या देखतच शहीद झालेले पाहून त्यांच्या तळपायाची आग मस्तकात गेली. भारतमातेला इंग्रजांपासून वाचविण्यासाठी राघोजी साळवे शहीद झाले. त्याच ठिकाणी क्रांतिवीर लहूजींनी दि.१७ नोव्हेंबर १८१७ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण केली. श्रद्धांजली अर्पण करतानाच त्यांनी मरेन तर देशासाठी आणि जगेन तरीही देशासाठी अशी क्रांतिकारी प्रतिज्ञाही केली होती. त्यांनी आपल्या वडिलांची समाधी उभारली. ही समाधी अजूनही पुणे-शिवाजी नगरजवळच्या वाकडेवाडी येथे आहे.



क्रांतिगुरू लहुजी हे दांडपट्टा चालवणे, तलवारबाजी, घोडेस्वारी, बंदूक चालवणे व निशाणेबाजी अशा सर्व युद्धकला कौशल्यांमध्ये निपुण होते. त्यांचे पिळदार शरीर व उभरलेली छाती पाहून शत्रूला सुद्धा घाम फुटत असे. जीवघेण्या शस्त्रांबरोबर ते अगदी एखाद्या खेळण्याप्रमाणे खेळत असत. आपल्या वडिलांचा मृत्यू व इंग्रजांनी केलेला पराभव त्यांना असह्य झाला. पराक्रमी घराण्यातील लहुजींनी इंग्रजांवर मात करण्यासाठी म्हणजे पर्यायाने देशाच्या स्वातंत्र्यासाठी मवाळपंथी नव्हे तर जहाल क्रांतिकारक निर्माण करण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांनी आपल्या अंगी असलेले युद्धकलेचे शिक्षण तरुणांना देण्याचे ठरविले. म्हणून त्यांनी इ.स.१८२२मध्ये पुण्यातील रास्ता पेठ येथे देशातील पहिले युद्ध कलाकौशल्य तालीमकेंद्र उघडले. ते नाना रास्ते सरदार यांच्या हस्ते सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रात सर्वच समाजांतील युवक तालीम घेण्यासाठी येऊ लागले. यात प्रामुख्याने बाळ गंगाधर टिळक, वासुदेव बळवंत फडके, महात्मा जोतीराव फुले, गोपाळ गणेश आगरकर, चापेकर बंधू, क्रांतिभाऊ खरे, क्रांतिवीर नाना दरबारे, रावबहाद्दूर सदाशिवराव गोवंडे, नाना मोरोजी, क्रांतिवीर मोरो विठ्ठल बाळवेकर, क्रांतिवीर नाना छत्रे, महात्मा जोतीराव फुलेंचे सहकारी वाळवेकर आणि परांजपे हे देखील लहुजी साळवे यांच्या आखाड्यातच शिकले. इ.स.१८४८ साली लहुजींच्या याच तालमीत सावित्रीमाई फुले यांची पहिली मुलींची शाळा सुरू झाली होती. म्हणून ते आद्य महाक्रांतिगुरू ठरतात, यात मुळीच शंका नाही.

दि.२० जुलै १८७९ रोजी इंग्रजांनी वासुदेव बळवंत फडके यांना देवरनावडगा मुक्कामी रात्री झोपेत असताना पकडले व त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरला. दि.७ नोव्हेंबर १८७९ रोजी वासुदेव फडके यांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. हे ऐकून लहुजींच्या मनावर खूप मोठा आघात झाला. अवघ्या तेरा महिन्यांनी म्हणजेच दि.१७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्याच्या संगमपुराच्या परिसरात एका झोपडीवजा घरामध्ये लहुजी साळवेजींची प्राणज्योत मालवली. त्याबरोबरच एका महा क्रांतिपर्वाचा शेवट झाला. त्यांची समाधी पुण्यातील संगमवाडी येथे आहे.

**!! आद्य महाक्रांतिगुरु लहुजींना जयंतीदिनी विनम्र अभिवादन !!**

**श्री.कृष्णकुमार निकोडे गुरूजी.**
**मु. पो. ता. जि. गडचिरोली**
**फक्त व्हॉ. नं. ९४२३७१४८८३**

## निवडणूक...

खूप काही देते घेते
मजेदार निवडणूक
नेते भलते विदुषक
रोजनवी करमणूक

स्वता:च केला गुंता
करूपाहे सोडवणूक
साहेब येणार सभेत
सामान्यां अडवणूक

असेअसावेत पुढारी
नेत्यांचीकरे वर्णणूक
युती आघाडी करता
अनिवार्य रे घाटणूक

खजिना केलाखाली
आश्वासन गुंतवणूक
जाणी सगळे दुर्भिक्ष
कुणी केली अटणूक

स्पष्टप्रश्न विचारताचं
कशीहोई अडचणूक
बोले केले खूपकाही
जनते नसे अराणूक

मतदाराहाती सुकाणूं
मतदानां दिसो चुणूक
निकाला नंतर आराम
असह्यझाली दमणूक

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# जननायक बिरसा मुंडा...

आज १५ ,नोव्हेंबर, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांची १५० वी जयंती. जननायक बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी रांची जवळील लिहती या खेडेगावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सुगमा मुंडा तर आईचे नाव करमी हातू असे होते. त्यांचे वडील शेतमजूर होते. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांना इंग्रजी माध्यमाच्या चाईबासा इंग्लिश मिशनिरी स्कुलमध्ये शिक्षणाची संधी मिळाली. इंग्रजी शिक्षणामुळे त्यांच्यावर आधुनिक विचारांचा प्रभाव पडला. बिरसा मुंडा हे जरी इंग्रजी शाळेत शिकत असले तरी त्यांना भारतीय संस्कृतीचा अभिमान होता.

१८७८ - ७९ मध्ये ब्रिटिशांनी वन कायद्यात बदल केला. या नव्या कायद्यानुसार आदिवासींच्या ताब्यात असलेल्या जंगलांवर ब्रिटिशांची मालकी झाली. या कायद्यामुळे आदिवासींवर बेघर होण्याची वेळ आली. आदिवासींनी उदरनिर्वाहासाठी फळे, कंदमुळे, लाकुडफाटे अथवा जनावरांसाठी चारा तोडल्यास त्यांना शिक्षा होऊ लागली आणि आदिवासींच्या आस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला. या कायद्या विरोधात आदिवासींनी न्यायालयात दाद मागितली पण तिथेही त्यांना न्याय मिळाला नाही. १८८४ साली बिहारमध्ये भीषण दुष्काळ पडला. भीषण दुष्काळ आणि उपासमारीने अनेक लोक मरण पावली. जननायक बिरसा मुंडा यांनी या काळात आदिवासी समाजाची निःस्वार्थ सेवा केली. भीषण दुष्काळात लोक उपासमारीने मरत असताना लोकांप्रति संवेदना व्यक्त करण्याऐवजी जुलमी ब्रिटिश सरकारने अवाजवी शेतसारा आकारला. ब्रिटिशांनी आकारलेल्या अवाजवी शेतसऱ्याला जमीनदार आणि जहागिरदारांनी पाठिंबा दिला त्यामुळे चिडलेल्या बिरसा मुंडा यांनी जनआंदोलन उभारले.

हे जनआंदोलन जहागीरदार व जमीनदारांच्या शोषणाविरुद्ध होते. आदिवासी बांधव मोठ्या संख्येने या जनआंदोलनात सहभागी होऊ लागल्याने हे आंदोलन दडपण्यासाठी जहागीरदार आणि जमीनदारांच्या माध्यमातून ब्रिटिशांनी बिरसा मुंडा यांना रोखण्याचा प्रयत्न केला. १८८५ साली बिरसा मुंडा यांना दोन वर्ष कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना हजारीबागच्या तुरुंगात पाठवण्यात आले. तुरुंगात असतानाच त्यांनी जुलमी ब्रिटिश सरकार उखडून टाकण्याचा संकल्प केला. दोन वर्षांची शिक्षा भोगून आल्यावर त्यांनी आदिवासी समाजाला संघटित करून ब्रिटिश सरकार विरुद्ध लढा पुकारला. १८८७ मध्ये बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने ब्रिटिशांविरुद्ध अनेक लढाया करून त्यांना जेरीस आणले. या लढाया त्यांनी पारंपरिक शस्त्रांनी म्हणजे भाले, तलवारी, धनुष्यबाण यांच्या साहाय्याने लढल्या. आदिवासी, दुर्गम, डोंगराळ भागातून पारंपरिक पद्धतीने लढा उभारून त्यांनी ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले. बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखालील आदिवासी समाज आपल्याला दाद देत नाही हे लक्षात आल्यावर ब्रिटिशांनी अतिरिक्त ८ कुमुक मागवली आणि आदिवासींवर हल्ला केला त्यात ४०० आदिवासी बांधव शहीद झाले. तरीही बिरसा मुंडा यांनी हार मानली नाही त्यांनी आपली लढाई चालूच ठेवली. १८९० मध्ये बिरसा मुंडा डोमवाडी पहाडात आदिवासी बांधवांना मार्गदर्शन करत असताना ब्रिटिश सैन्याने त्यांच्यावर हल्ला केला. भीषण लढाई झाली. बिरसा मुंडा यांना अटक करून रांचीच्या कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली. २० मे १९०० रोजी त्यांना एकांत कोठडीत ठेवण्यात आले.एकांत कोठडीत जेवण करण्यास त्यांनी नकार दिला त्यामुळे त्यांना अशक्तपणा आला. न्यायालयातच ते बेशुद्ध पडले. त्यांना न्यायालयातून कारागृहात आणण्यात आले औषध उपचार करण्यात आले त्यांची तब्येत सुधारली मात्र ९ जून १९०० रोजी त्यांना रक्ताची उलटी झाली ते बेशुद्ध पडले व त्यातच त्यांची प्राणज्योत माळवली. त्यांचा मृत्यू एशियाटिक कॉलरा या आजाराने झाला असे सरकारच्या वतीने सांगण्यात आले असले तरी त्या आजाराची कोणतेही लक्षणे त्यांच्या शरीरावर दिसत नव्हते त्यामुळेच इतिहासकार ब्रिटिशांनी त्यांची हत्या केली असा संशय व्यक्त करतात. नेपोलियनला जसे आर्सेनिक देऊन ठार मारले तेच लक्षणे बिरसा मुंडा यांच्या शरीरावर दिसत होते शिवाय त्यांना कारागृहातच दफन करून पुरावा नष्ट करण्यात आला. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात जननायक बिरसा मुंडा यांचे योगदान अतुलनीय असे आहे. आदिवासींच्या न्याय हक्कासाठी मोठा लढा उभारून त्यांनी जे महान कार्य केले त्याला तोड नाही त्यामुळेच त्यांना आदिवासी जननायक हा किताब जनतेने बहाल केला.

**आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!**

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायलयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## हदगाव विधानसभा निवडणूक दुसऱ्या प्रशिक्षणात ६० कर्मचाऱ्यांनी मारली दांडी

### गैरहजर कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.१४, हदगांव (नांदेड) :** हदगाव विधानसभा निवडणुकीसाठी नुकत्याच संपन्न झालेल्या दुसऱ्या प्रशिक्षणात ६० कर्मचाऱ्यांनी दांडी मारली आहे. गैरहजर कर्मचाऱ्यांना संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी कारणे दाखवा नोटीस बजावल्या आहेत. हदगाव-हिमायतनगर विधानसभा मतदारसंघ निवडणुक प्रक्रियेसाठी ३७६ मतदान केंद्राध्यक्ष नियुक्त करण्यात आले होते त्यात २१ जन गैरहजर राहिले तर सहायक मतदान केंद्राध्यक्ष ३७६ नियुक्त करण्यात आले होते त्यात १४ गैरहजर राहिले. तर इतर मतदान अधिकारी ७५२ नियुक्त केले होते त्यात २५ कर्मचारी गैरहजर राहिले असे एकूण ६० कर्मचारी दोन दिवस झालेल्य प्रशिक्षणास गैरहजर राहिल्याने त्यांने संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. तिसरे प्रशिक्षण १९ नोव्हेंबर ला आसून त्याच दिवशी कर्मचारी मतदान साहित्य घेवून केंद्रावर रवाना होतील २० नोव्हेंबर २४ ला मतदान आसून २३ तारखेला मतमोजणी आहे.

## वृध्द, दिव्यांग आणि निवडणूक कर्तव्यावर असणाऱ्यांचे मतदान सुरळीत सुरु



**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.१४, हदगांव (नांदेड) :** हदगाव-हिमायतनगर विधानसभा मतदारसंघासाठी ८५ पेक्षा अधिक वय असलेले वृध्द मतदारांनसाठी तसेच दिव्यांग मतदारांनसाठी आजपासून मतदान प्रक्रिया सुरू झाली आहे. यासाठी २१६ मतदारांची नाव नोंदणी झाली आहे. हे मतदान २ दिवस चालणार आहे.

यासाठी ८ पथके नियुक्त करण्यात आली आहेत. आज निवडणूक निरीक्षक (सामान्य) शैलेन्द्र कुमार, निवडणूक निर्णय अधिकारी अविनाश कांबळे, सहायक निवडनूक निर्णय अधिकारी सुरेखा नांदे, पल्लवी टेमकर आदिनी मतदान घेण्यासाठी कर्मचाऱ्यांच्या टिमला रवाना केले आहे. सर्व कर्मचाऱ्यांना निवडणूक निरिक्षकांनी मागदर्शक सुचना केल्या आहेत. निवडणूक कर्तव्यावर असलेल्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मतदान आज तहसिल कार्यालयात सुरळीत सुरू झाले आहे. यासाठी ३ बुध सुरु आहेत. सदर मतदान प्रक्रिया १८ नोव्हेंबर पर्यंत चालणार आहे. यासाठी नायब तहसीलदार ए.एम.तामसकर, महेश चामणीकर हे नोडल अधिकारी म्हणून काम पहात आहेत. आज निवडणूक निरीक्षक (सामान्य) शैलेन्द्र कुमार यांनी तालुक्यातील ल्याहरी येथील बैल बाजारात मतदारांना भेटून निर्भयपणे मतदान करा असे आवाहन केले.

## मतदार राजा जागा हो, लोकशाही चा धागा हो - पथनाट्य सदरीकरण



**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**दि.१४, खंडाळा (सातारा) :** सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय, खंडाळा व पं.स.खंडाळा स्वीप मतदान जनजागृती अभियान संयुक्त विद्यमाने मतदान जन-जागृतीसाठी मतदार राजा जागा हो...लोकशाहीचा धागा हो... पथनाट्य सादरीकरण करण्यात आले. प्रारंभी सहाय्यक बीडीओ प्रकाश बोंबले यांच्या हस्ते प्राचार्य डॉ.हणमंत जाधव यांचे स्वागत करण्यात आले. पथनाट्याची संकल्पना प्रा.अमीर इनामदार यांची आहे. अक्षय देशमाने, अथर्व देशमुख, ऋतुजा मोरे, ऋतुजा गार्डी, ऋतुजा यादव, मानसी शेवाळे, समीक्षा भोसले, प्रेरणा क्षीरसागर, गौरी पवार, तेजस्विनी चव्हाण, धनश्री पवार, छाया कचरे, ईश्वरी साळुंखे या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सक्रिय सहभाग घेत मतदान राष्ट्रीय कर्तव्याची शान, न राहो वंचित मतदार साऱ्यांनी बजावू मताधिकार, सक्षम लोकशाहीचे प्रभावी माध्यम मतदान असे विधायक संदेश पथनाट्य माध्यमातून दिले. यावेळी विस्तार अधिकारी रमेश यादव, प्रा.प्रदीप मेंढापुरे, प्रा.अक्षय वाघापुरे, गणेश ढमाळ, विनोद सपकाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

# मी लंके साहेबांची वाघीण, कसे काम करते तेच पहा

## भाळवणी येथील सभेत राणीताई लंके गरजल्या

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, पारनेर (अहिल्यानगर) :** मला भाषण करता येत नाही, मी विधिमंडळात काय बोलणार अशी टीका विरोधक करीत आहेत. मी विरोधकांना निक्षून सांगते की, मी खा.नीलेश लंके यांच्या पावलावर पाऊल ठेउन काम करणार असून मी लंके साहेबांची वाघीण आहे हे लक्षात ठेवा असा इशारा महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांनी दिला. मला भाषण करता येत नाही, मी विधिमंडळात काय बोलणार अशी टीका विरोधक करीत आहेत.

मी विरोधकांना निक्षून सांगते की, मी खा. नीलेश लंके यांच्या पावलावर पाऊल ठेउन काम करणार असून मी लंके साहेबांची वाघीण आहे हे लक्षात ठेवा असा इशारा महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांनी दिला. दरम्यान या सभेत जिल्हा परिषदेच्या कृषि व पशुसंवर्धन समितीचे मा.सभापती बाबासाहेब तांबे, पंचायत समितीचे मा. सदस्य विकास रोहोकले यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके ढवळपुरी गटातील प्रचाराचा शुभारंभ भाळवणीचे ग्रामदैवत नागेश्वर



मंदिरात नारळ वाढवून करण्यात आला. त्यावेळी लंके यांनी विरोधकांच्या टिकेला उत्तर देत इशारा दिला. राणी लंके म्हणाल्या,आजची गर्दी पाहता ही प्रचारसभा नाही तर विजयी सभा आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

खासदार निलेश लंके हे आमदार असताना त्यांनी मतदारसंघासाठी मोठा निधी मंजूर केला. भविष्यातही विकास कामांची ही परंपरा सुरू राहणार असल्याचा विश्वास लंके यांनी व्यक्त केला. यावेळी बोलताना खासदार निलेश लंके म्हणाले, ज्यांनी प्रवेश केला, पाठिंबा दिला, त्यांना सर्वांना प्रतिष्ठा, सन्मान दिला जाईल. पुर्वीच्या सहकाऱ्यांनाही त्यांचा सन्मान मिळेल. जसे कळसाला महत्त्व तसेच पायाला महत्त्व आहे. तुम्ही काळजी करू नका. महाविकास आघाडीचे सरकार येणार आहे, सर्वांना योग्य न्याय मिळेल. तुमच्या सर्वांच्या आशिर्वादाने माझे पक्षात चांगले वजन आहे. राजकारणात कोणी कोणाचे मित्र अथवा शत्रू नसतात. महाविकास आघाडीमध्ये विविध विचारसरणीचे पक्ष एकत्र आले आहेत. तुम्ही एकत्र आले तर बिघडले कुठे? माझ्या खांद्यावर मान टेकवल्यावर ती सुरक्षित ठेवण्याची माझी जबाबदारी आहे. मनमोकळे रहा,म ठेे मतांधिक्य द्या. विश्वास संपादन करणे महत्त्वाचे असते. नव्याने प्रवेश केलेल्यांचे स्वागत करतानाच पूर्वाश्रमीच्या कार्यकर्त्यांनाही खा.लंके यांनी दिलासा दिला. यावेळी प्रा. शशिकांत गाडे, बाबासाहेब तरटे, माधवराव लामखडे, जयंत वाघ, ॲड. राहुल झावरे, बबलू रोहोकले,अशोक घुले, बाबासाहेब तांबे, विकास रोहोकले, बाळासाहेब खिलारी, रविंद्र राजदेव, सुरेश धुरपते, सुदम पवार, बाळासाहेब हराळ, गंगाराम रोहोकले, कारभारी पोटघन, सुमन तांबे, लिलाबाई रोहोकले आदिंसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सत्तेसाठी पक्ष बदलणार्यांनी तालुका उद्धवस्त केला - शरद पवार

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, राहाता (अहिल्यानगर) :** सत्तेसाठी अनेक पक्ष बदलणार्यांनी एकेकाळचा समृद्ध राहाता तालुका उद्धवस्त केला आहे. ही सत्ताधार्यांची टोळी उद्धवस्त करण्यासाठीच प्रभावती घोगरे यांच्या रुपाने जनता सरसावली आहे. निळवंडे धरण व कालव्यांची कामे ही फक्त आ. बाळासाहेब थोरात यांनीच केली असल्याचे स्पष्ट प्रतिपादन ज्येष्ठ नेते खा. शरद पवार यांनी केले. राहाता येथील वीरभद्र मंदिरासमोरील प्रांगणात महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रभावती घोगरे यांच्या प्रचार सभेत ते बोलत होते.

यावेळी काँग्रेसचे नेते आ. बाळासाहेब थोरात, खा.भाऊसाहेब वाकचौरे, आ. डॉ. सुधीर तांबे, जिल्हाध्यक्ष जयंत वाघ, राजेंद्र फाळके, करण ससाणे, रावसाहेब म्हस्के, सुधीर म्हस्के, बाळासाहेब गायकवाड, ॲड. नारायण कार्ले, सचिन चौगुले, पंकज लोंढे, सुहास वहाडणे, धनंजय गाडेकर, राजेंद्र बावके,



आ. रिटा चौधरी, सिमोज जगताप, सुरेश थोरात, नवनाथ आंधळे, डॉ. एकनाथ गोंदकर, लताताई डांगे, शितल लहारे आदींसह महाविकास आघाडीचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

खा. पवार म्हणाले, लोकसभेमध्ये महाराष्ट्रातील जनतेने महाविकास आघाडीला मोठी ताकद दिली. यामुळे राज्य सरकार घाबरले असून फक्त घोषणाबाजी करत आहे. महिलांना पंधराशे रुपये देण्याऐवजी सुरक्षितता महत्त्वाची आहे. महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर महिलांना ३ हजार रुपये तर बेरोजगार युवकांना ४ हजार रुपये भत्ता देणार आहोत. अनेक वर्ष घरात सत्ता असूनही राहाता मतदार संघातील महत्त्वाचा नगर-मनमाड रस्ता या लोकांना करता आला नाही. रस्त्यावरून गेले तर सर्वांची हाडे खिळखिळी होतात. शेती महामंडळाच्या जमिनीवर नॉलेज सिटी उभारण्याचा प्रस्ताव मी दिला होता. पण त्याला स्वार्थासाठी येथील मंडळीने अडथळा निर्माण केला.

सत्तेसाठी अनेक पक्ष बदललेल्या. एकेकाळचा समृद्ध आणि वैभवशाली असलेला राहाता तालुका त्यांनी उद्धवस्त केला. या तालुक्यात दहशतवाद करणारी टोळी निर्माण झाली असून ती जनतेने उद्धवस्त करावी,असे सांगताना प्रभावती घोगरे या शंकरनाना खर्डे व चंद्रभान दादा घोगरे यांचा समृद्ध वारसा जोपासणाऱ्या असून त्या माझी मुलगीच आहे असे शरद पवार यांनी सांगितले.

# शिंदे पिता पुत्रांचे राजकारण संपण्याची वेळ आली आहे : आ. राजू पाटील

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१४, डोंबिवली (ठाणे) :** कल्याण ग्रामीण मध्ये भाजपाचे कल्याण जिल्हा उपाध्यक्ष संदीप माळी यांना तडीपार करण्यात आले आहे मनसेचे आमदार राजू पाटील यांच्या पक्षाडते करत असल्याची करण्यात आल्याची चर्चा आहे.

यावर आता आमदार राजू पाटील यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्ती केली आहे. आमदार पाटील म्हणाले गावात एक कार्यक्रम आयोजित केला होता. संदीप माने माझा मित्र आहे माझे नातेवाईक आहे. प्रत्येक निवडणुकीत




कोणी काही पक्ष बघत नाही. त्याच्या गावात मी गेलो. संदीप माळी यांनी माझा सत्कार केला. याचा एवढा राग शिंदे पिता पुत्रांना आला की रात्रभर पोलीस स्टेशनला त्याला बसून ठेवले.

मी त्याला जाऊन भेटलो. तो म्हणाला तडीपार केलं तर करून दे, तुम्ही बिनधास्त राहा, राजकारण एका लिमिटच्या पुढे जाऊन वातावरण गढूळ करायचं काम पिता पुत्रांनी घेतला आहे ना ते कुठेतरी संपवण्याची वेळ आलेली आहे. अशा शब्दात आमदार पाटील यांनी शिवसेना शिंदे गटाचे मुख्यमंत्री शिंदे व खासदार श्रीकांत शिंदे यांच्यावर टीका केली आहे.

# निवडणुकीत भाजपचे संजीव रेड्डी बोदकुरवार विजयाची हॅट्रिक मारणार काय?

**अक्षराज : राजू गागरे**

**दि.१४, झरी (यवतमाळ) :** वणी विधानसभा मतदारसंघ हा चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाचा एक भाग आहे. महाराष्ट्र राज्यातील यवतमाळ जिल्ह्यात आहे. वणी विधानसभा निवडणुकीत अटीतटीची लढत रंगतदार होणार आहे. या निवडणुकीच्या आखाड्यात बारा उम ेदवार राजकीय भविष्य अजमावत आहे. चौरंगी अत्यंत चुरशीची अटीतटीची लढत असल्याचे चित्र आहे. महायुती विरूद्ध महाविकास आघाडी असा निवडणुक आखाडा रंगला असून मनसे सह दिग्गज अपक्ष उमेदवारी रिंगणात उतरले आहे. प्रत्यक्षात डोअर टू डोअर प्रचाराला उमेदवारांच्या वतीने पसंती दिली जात आहे.

वणी विधानसभेच्या निवडणुकीत बारा उमेदवार राजकीय भविष्य आजम ावणार आहे. यात भाजपचे संजीव रेड्डी बोदकुरवार, शिवसेना (उबाठा) चे संजय देरकर, अपक्ष संजय खाडे, मनसेचे राजू उंबरकर,भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे अनिल हेपट, वंचित बहुजन आघाडीचे राजेंद्र निमसटकर, बहुजन समाज पार्टीचे अरूण कुमार खैरे, अपक्ष हरीष पाते, अपक्ष केतन पार्खी, अपक्ष नारायण गोडे, अपक्ष निखिल ढुरके, अपक्ष राहुल आत्राम, यांचा समावेश आहे.

मागिल झालेल्या वणी विधानसभा निवडणुकांचे निकाल पाहता भाजपचे संजीव रेड्डी बोदकुरवार यांना २०१४ मध्ये ४१ हजार १७८ मते मिळवित विजय झाला. तर २०१९ मध्ये ६७ हजार ७१० मते मिळवित विजयाचे मानकरी ठरले. दोन टर्म सातत्याने वणी विधानसभेवर भाजपच सरस ठरला. त्यामुळे पुन्हा एकदा २०२४ विधानसभेच्या निवडणुकीत भाजपचे संजीव रेड्डी बोदकुरवार हॅट्रिक मारणार काय याकडे तमाम जनतेचे लक्ष लागले आहे. मागिल २००९ मध्ये काँग्रेस पक्षाच्या ताब्यात गेलेला गड त्यावेळी २०१४ मध्ये संजीव रेड्डी बोदकुरवार यांनी ४१ हजार १७८ मते मिळवित वामनराव कासावार व विश्वास नांदेकर दोन्ही दिग्गज नेत्यांचा पराभव करीत



विजयी झाले. विधानसभा निवडणुकीत गेल्या दोन पंचवार्षिक टर्म पासून काँग्रेस पक्षाला पराभवाचा सतत सामना करावा लागल्याचे पहायला मिळाले. २००४ च्या निवडणुकीत मध्ये विश्वास नांदेकर यांनी ६० हजार पेक्षा अधिक मते मिळवित विजयी झाले होते. त्यामुळे नांदेकर यांच्या पाठींब्याला कमी लेखता येणार नाही.

एकेकाळी वणी विधानसभा म तदारसंघ काँग्रेसचा बालेकिल्ला समजला जायचा. काँग्रेस पक्षाचे वामनराव कासावार हे चार वेळा सत्तेवर राहीले. त्यांना १९९० मधील विधानसभा निवडणुकीत ४७ हजार १४२ मतांनी विजय मिळविला, १९९५ मध्ये ४२ हजार ८८१ मतांनी विजयी, १९९९ मध्ये ३८ हजार ७२५ मतांनी विजयी आणि २००९ मध्ये ५५ हजार ६६६ मते मिळवित विजयी ठरले. यावेळेसही २०२४ विधानसभेच्या निवडणुकी करीता कांग्रेस तर्फे उमेदवारी साठी जोरदार प्रयत्न केले गेले मात्र अपयशी ठरले. आता मात्र शिवसेना (उबाठा) चे संजय देरकर यांना उमेदवारी दिली आहे. महाविकास आघाडीतील मित्र पक्ष म्हणून काँग्रेस पक्षही संजय देरकर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. संजय देरकर हे मागिल अनेक पंचवार्षिक विधानसभा निवडणुक सातत्याने लढवित असल्याने निवडणुकांचे पक्के अनुभवी आहे. २००९ मधील विधानसभा निवडणुकीत ४१ हजार पेक्षा अधिक मते संजय देरकर यांना मिळाली त्यावेळी ते अपक्ष उम ेदवार होते. आता मात्र अपक्ष उमेदवार संजय खाडे निवडणुकीच्या मैदानात उतरल्याने शिवसेना (उबाठा)चे संजय देरकर यांना निवडणूक कठीण जाणार असल्याचा अंदाज आहे.

सध्या निवडणुक वातावरण चांगलेच तापले असून निवडणुकीत कोण बाजी मरणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. वणी विधानसभा क्षेत्रात कुणबी समाज बहुसंख्येने आहेत. निवडणुकीच्या आखाड्यातील काही उमेदवार मतांचे विभाजन व्हावे म्हणून कुणबी समाज कार्ड खेळू पाहात आहे. मात्र त्यांनीही सावध भुमिका घेतल्याचा अंदाज येत आहे. संजय खाडे अपक्ष उमेदवार रिंगणात असल्याने त्यांची निवडनुक खेळी निर्णायक ठरणार आहे. तसेच या निवडणुकीत महत्वाची भूमिका समजले जाणारे मनसेचे उमेदवार राजु उंबरकर यांचा मागिल विधानसभा निवडणुकीत मतदान मिळवण्याच्या संख्येचा आकडा चढ उतार आहे. म नसेचे राजू उंबरकर यांना २००९ मध्ये ११३२० मते मिळाली. २०१४ मध्ये २७०५४ मते मिळाली.तर २०१९ मध्ये १६११५ मते मिळवण्या पर्यंत मजल मारता आली. परंतु यावेळी मात्र चौरंगी लढत असल्याने मनसेचे उमेदवार राजू उंबरकर यांना सुद्धा विजय दुर नसल्याचे बोलले जात असल्याच्या चर्चा आहे. निवडणुकीच्या आखाड्यात बारा उम ेदवार पैकी कोण बाजी मरणार हे २३ नोव्हेंबरच्या निकाला नंतरच कळणार आहे. पण सध्याचे निवडणुक वातावरण पाहता तालुक्यातील खेडेगावात उमेदवार महागड्या गाड्यांच्या ताफ्यासह दररोज प्रचाराचा धडाका सुरू आहे. धाबे, बियर बार वर अनेक काही पक्षाचे कार्यकर्ते ताव मारत असल्याचेही चित्र आहे. खरं तर निवडणुका म्हणजे केवळ सत्तेची लढाई नव्हे तर एक समाजसेवेची विकासाची आणि सामान्य जनतेच्या दैनंदिन जीवनात विविध समस्यांच्या निराकरणाची लढाई आहे. आजचा काळ हा विचार करणारा काळ आहे. सत्तेवर येण्यासाठी राजकारणी मुळ विषयापासून दुर ठेवत जनतेचे लक्ष विचलित करीत असल्याचे वाटत आहे. त्यामुळे तालुक्यातील मतदारांनी सुद्धा या खेळाचे उत्तरदायित्व ठरवून योग्य निर्णयाकडे वाटचाल करणे आवश्यक आहे.

अक्षराज

४ बुलडाणा, शुक्रवार, दि.१५ नोव्हेंबर २०२४ संमिश्र

# नवी मुंबईत महापे शाळेमध्ये बालदिन उत्साहात साजरा

**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.१४, नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिका प्राथमिक शाळा क्र. ४० महापे यांच्या वतीने आज भारताचे पहिले पंतप्रधान चाचा नेहरू यांचा जन्म दिन अर्थात बालदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. बालदिनाच्या निमित्ताने विशेष कार्यक्रमाचे आयोजन शाळेचे मुख्याध्यापक रवींद्र म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

आज माध्यमिक विद्यालय ११३ चे मुख्याध्यापक दीपक बडगुजर यांचा वाढदिवस असल्याने सकाळी सकाळीच त्यांच्या वतीने प्रत्येक विद्यार्थ्याला गुलाब पुष्प व चॉकलेट देवून शाळेच्या प्रवेश द्वाराजवळ मुलांचे स्वागत करण्यात आले. मुलांनी त्यांना संगीतमय शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी बालदिनाचे औचित्याच्या निमित्ताने शाळेचे संसदीय मंडळ व शाळेच्या व्यवस्थापन समितीतील विद्यार्थी प्रतिनिधी कु.मोनी प्रजापती, कृष्णा जाधव, नेहा किस्कू, मानसी जाधव, आराध्य राउत, यश बिंद, रुद्र एकावडे, मनीषा कांबळे यांच्या हस्ते चाचा नेहरूंच्या प्रतिमेस पुष्पहार घालून व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांना देखील अभिवादन करण्यात आले.

सदर प्रसंगी शाळेच्या शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा दुर्गा ठाकूर व माता पालक संघाचे सदस्य उपस्थित होते. या कार्यक्रमात सुरुवातीला शाळेतील शिक्षक राहुल जाधव यांनी चाचा नेहरूंचा व लहुजी साळवे यांचा जीवन परिचय अत्यंत सुरेखपणे उपस्थितांना करून दिला.

यावेळी शाळेतील विद्यार्थी गायत्री गुप्ता, तृप्ती मिली, सुभाष साहू, दीपक बिंद, आशा बोध, अमोल जावळे, अक्षरा पांचाल, सोहन जाधव या विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषांमधून आपल्या मनोगतातून पंडित नेहरू व लहुजी वस्ताद यांची जीवनमुल्ये, त्यांचे कार्य याविषयी सविस्तर माहिती दिली. यावेळी बाल गीते व बडबड गीत गायनाचा चला गाणी म्हणू या हा रंगारंग कार्यक्रम घेण्यात आला.

यात माजी मुख्याध्यापक मारुती गवळी, शिक्षक राहुल जाधव व शिक्षिका कोमल डेन्गाने यांनी कराओकेवर सुंदर गीतांचा नजराणा सादर केला. तर



आयेशासनदी, अशरफ सनदी, गायत्री गुप्ता, परी वस्के, संबोधि मुरके यांसारख्या बालकलाकारांनी अत्यंत उत्तम रीतीने गीते सादर केली.

यावेळी विविध मनोरंजनात्मक मैदानी व बैठे खेळाचे आयोजन सर्व विद्यार्थ्यांसाठी करण्यात आले होते. यावेळी पंडित नेहरू यांच्या जीवनावरील सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्न मंजुषा देखील घेण्यात आली.

यावेळी मनोरंजनात्मक अशी ढोल व ताशा वादनाच्या जुगल बंदीचे व संगीत खुर्चीचे देखील आयोजन करण्यात आले होते. यावेळी शाळेतील १ ली ते १० वी च्या सर्व विद्यार्थी, पालक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, माता पालक संघातील माता पालक, शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी याना मतदार जागरूकता शपथ देण्यात आली व सर्व पालकांना २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी सर्व शाळेतील विद्यार्थ्यांना सुग्रास न्याहारीचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाचे संयोजन व नियोजन मुख्याध्यापक रवींद्र म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली व माजी मुख्याध्यापक तथा शाळा कार्यक्रम समन्वयक मारुती गवळी यांच्या संकल्पनेतून करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल जाधव यांनी केले. सदर कार्यक्रमात प्रीती भंडारे, कोमल डेन्गाने, रुपाली घोडके, स्वाती कोर, रीना घाटे या शिक्षक तसेच महेश पाटील, अनिता देवकर, मंदा लोंढे, पल्लवी मोहरे, नारायण जाधव या शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सक्रीय सहभाग नोंदविला.

# परिवर्तनाच्या लढाईत सामील व्हा - काशिनाथ दाते

## तालुक्यातील महायुतीचे सर्व पदाधिकारी माझ्यासोबत

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, पारनेर (अहिल्यानगर)** : महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांच्या प्रचार, गाव भेट दौऱ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी बोलताना काशिनाथ दाते म्हणाले की, तालुक्यात बेरोजगारी वाढली आहे.

स्थानिक युवकांना एम.आय. डी.सी.मध्ये नोकरी मिळाली पाहिजे. रोजगार मिळाला पाहिजे. आपल्याला सुसंस्कृत तालुका घडवायचा आहे. म्हणून माझी खरी उमेदवारी आहे. महायुतीचे सरकार २ वर्षांपूर्वी राज्यात आल्यानंतर त्यांनी घेतलेले निर्णय तुमच्यासमोर आहे. पहिला लोकप्रिय झालेला निर्णय म्हणजे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण आपण थोडे विचार करा आपण कधी आपल्या महिलेचे बँकेत खाते उघडले का ? कधी महिलांच्या खात्यावर पैसे टाकले का? परंतु जे काम आपल्याला सुचले नाही ते महायुतीच्या सरकारने करून दाखवले.

लाडकी बहिण योजनेचे पैसे देत



असताना या तालुक्यात ७० हजार महिलांचे बँकेत खाते उघडली गेली. शासनाने दिवाळीपूर्वी साडेसात हजार खात्यावर दिले आणि हे पैसे कधी काढायचे व खर्च करण्याचा अधिकार माझ्या बहिणींना दिला.

महायुतीचा उमेदवार म्हणून माझ्या लाडक्या बहिणी मला मतदान केल्याशिवाय राहणार नाहीत.

महायुती सरकारने शेतकऱ्यांचे कृषी पंपाचे वीज बिल माफ केले ही योजना पुढील पाच वर्षे असणार आहे.

पुढारी एका बाजूला आणि सर्वसामान्य जनता एका बाजूला असे चित्र तालुक्यात झाले आहे. निरो सर्जन डॉक्टर सुजय विखे यांच्या पराभव मनाला टोचणारा आहे. लाडक्या बहिणींना सरकारने दिवाळीपूर्वी भाऊबीज दिली आहे हा निर्णय खुप चांगला आहे. प्रशासकीय अनुभव दाते सरांकडे खूप मोठा असल्याने ते योग्य उमेदवार आहेत.

**- सुरेश बोरुडे (माजी सरपंच नारायणगव्हाण)**

गावागावात भांडणे लावली, सरपंचावर अविश्वास आणणे, सोसायटी निवडणुकीत लक्ष घालणे, तरुणांना रोजगार नाही कोण देणार तरुणांना रोजगार एवढे प्रश्न तालुक्यात आहे. या निवडणुकीत खुप विचार करुन मतदान करा, हा तालुका राष्ट्रवादीला मानणारा आहे दाते सरांचे चिन्ह घड्याळ आहे तेच निवडून येणार

**- अशोक कडिले**

७ रुपये लिटर दुधाला अनुदान दिले. एक रुपयात पिक विमा दिला. सर्वात महत्त्वाचं म्हणजे मुलींना पहिलीपासून तर पदवीधर पर्यंत मोफत शिक्षण जाहीर केले असे अतिशय चांगले निर्णय या सरकारने घेतले. म्हणून राज्यात महायुतीचे सरकार सत्य येणार आहे केंद्रात आणि राज्यात एकच विचाराचे सरकार असल्यास या राज्याचा भरभराट झाल्याशिवाय राहणार नाही.

यावेळी भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे, जिल्हाध्यक्ष प्रशांत गायकवाड, जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, सभापती गणेशराव शेळके, भाजप तालुकाध्यक्ष राहुल पाटील शिंदे, तालुकाध्यक्ष विक्रम कळमकर, सुषमा रावडे, प्रमोद घनवट, सुनिल थोरात, सरपंच मनोज मुंगशे, लहू भालेकर, सरपंच संतोष शेळके, चेअरमन रामचंद्र शेळके, आरपीआय तालुकाध्यक्ष राजु उबाळे, शुभम गाडेकर उपस्थित होते.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ विविध बाबींवरील निर्बंध आदेश निर्गमित

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१४, बुलडाणा :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ चा कार्यक्रम घोषित करण्यात आला असून जिल्ह्यात बुधवार, दि.२० नोव्हेंबर रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान होणार आहे. आचारसंहिता कालावधीत कोणताही भंग होऊ नये. यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा न्याय संहिता-२०२३ चे कलम १६३ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन जिल्ह्यातील संपूर्ण कायक्षेत्रात दि. १८ नोव्हेंबरचे सायंकाळी ६ वाजेपासून ते दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीकरीता विविध बाबींवर निर्बंध लागू करण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी निर्गमित केले आहे.

**आदेश याप्रमाणे :** उक्त कालावधीत बेकायदेशिर जमाव जमविण्यास व सार्वजनिक प्रचारसभा आयोजनास बंदी राहील. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ करीता मतदान पथके मतदान केंद्राच्या २०० मीटर त्रिज्येच्या परिसरात कोणत्याही सार्वजनिक वा खाजगी जागेमध्ये ध्वनीवर्धक किंवा ध्वनीक्षेपक यासारखे मानवी आवाजाचे वर्धन करणाऱ्या किंवा जो जसाश तसा ऐकविणाऱ्या उपकरण संच लावण्यास, वापरण्यास, चालविण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

मतदारांना पुरविण्यात आलेल्या अनौपचारिक ओळखचिठ्ठ्या साध्या पांढऱ्या कागदावर असाव्यात व त्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवारांचे नाव किंवा पक्षाचे नाव मुद्रित करण्यावर बंदी राहील. मतदानकेंद्राचे १०० मीटर परिसरात निवडणूक कर्तव्यावरील वाहन वगळता इतर सर्व वाहनांस बंदी राहील. मतदान केंद्रात मतदार, उमेदवार व त्यांचे निवडणूक मतदान प्रतिनिधी व्यतिरिक्त इतर व्यक्तिस मतदान केंद्रात प्रवेशावर बंदी असेल. मतदारांना लाच देणे, मतदारांवर गैरवाजवी दडपण, मतदारांना धाकदपट दाखविणे, तोतयेगिरी करणे तसेच मतदान केंद्राचे १०० मीटर परिसरात प्रचार करण्यास बंदी राहील. मतदारांना मतदानाचे दिवशी मतदान केंद्रावर ने आण करण्याचे प्रयेस पायबंद घालण्यासाठी टॅक्सी, खाजगी कार, ट्रॅक ऑटोरिक्षा, मिनी बस, स्टेशन व्हॅन, स्कूटर, मोटार सायकल इत्यादी सर्व प्रकारच्या वाहनावर बंदी राहील. मतदानाच्या दिवशी ओळखचिठ्या वाटपाच्या ठिकाणी किंवा मतदान केंद्राचे परिसरात भित्तीपत्रके, ध्वज, चिन्ह आणि इतर प्रचार साहित्य यांचे प्रदर्शन करण्यास बंदी राहील.

ज्या व्यक्तीच्या सुरक्षितेला धोका असल्याबाबत खात्री पटल्यामुळे सरकारी सुरक्षा पुरविण्यात आली असेल, अशी कोणतीही व्यक्ति त्याच्या सुरक्षा कर्मचाऱ्यासह मतदार केंद्राचे १०० मिटर परीसरात प्रवेश करणार नाही. अशी व्यक्ति मतदार असली तरी निव्वळ मतदान करण्याकरिता सुरक्षा कर्मचाऱ्यासही मतदार केंद्र परिसरात ये जा करण्यावर निर्बंध राहील, तथापी विशेष सुरक्षा व्यवस्था प्रदान केल्या व्यक्तिच्या विशेष सुरक्षा पथकास शस्त्रासह मतदान केंद्राचे केवळ दारापर्यंत संरक्षित व्यक्ती सोबत जाता येईल.

एका वैयक्तिक सुरक्षा अधिकाऱ्यास शस्त्राचे प्रदर्शन न करता तसेच मतदान प्रक्रियेत कोणत्याही प्रकारे अडथळा न करता संरक्ष व्यक्तीस मतदान केंद्रात सोबत करता येईल. ज्या व्यक्तिच्या सुरक्षिततेला धोका असल्याबाबत खात्री पटल्यामुळे सरकारी सुरक्षा पुरविण्यात आलेली असेल किंवा त्या व्यक्तिकडे खाजगी सुरक्षा रक्षक आहेत अशा कोणत्याही व्यक्तिस निवडणूक प्रतिनिधी वा मतदान प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यास बंदी राहील. मतदान केंद्रात मतदानाचे दिवशी मोबाईल, स्मार्टफोन, वायरलेस सेट इत्यादी नेण्यास प्रतिबंध राहील. मतदान केंद्राध्यक्ष, आचारसंहिता कायदा व सुव्यवस्था पथक प्रमुख/निवडणूकीच्या कर्तव्यावरील सुरक्षा कर्मचारी यांना उक्त प्रतिबंध लागू राहणार नाही.

**निर्बंधाचे कालावधीत खालील बाबींवर बंदी असणार नाही. -**

बुलडाणा जिल्ह्यामधील विधानसभा मतदार संघात निवडणूक प्रचार दिनांक १८ नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजता पासून बंद होत असला तरी, घरोघरी प्रचारावर निर्बंधाचे कालावधीत प्रतिबंध असणार नाही परंतु ५ पेक्षा अधिक व्यक्तींना एकत्र येण्यास प्रतिबंध असेल. दवाखान्याच्या गाड्या, ॲम्बुलन्स, दुधगाड्या, पाण्याचे टँकर्स, विद्युत विभाग/पोलीस/निवडणूक कर्मचारी यांच्या वाहनावर बंदी राहणार नाही. विहीत मार्गाने जाणाऱ्या बस गाड्यावर बंदी राहणार नाही. टॅक्सी इत्यादी वाहने बस स्टेशन, रेल्वे स्टेशन हॉस्पीटल कडे जाणारी वाहने यावर बंदी राहणार नाही. दिव्यांग किंवा आजारी व्यक्तिस मतदान केंद्रावर मतदान करण्यासाठी जाणे-येणे करीता आजारी किंवा दिव्यांग व्यक्तिचे वैयक्तिक वाहनास बंदी असणार नाही. सदर आदेश बुलडाणा जिल्ह्यामधील संपूर्ण क्षेत्राकरीता दि. १८ नोव्हेंबर २०२४ चे सायंकाळी ६ वाजता पासून ते विधानसभा मतदानाच्या दिवशी दि.२० नोव्हेंबर २४ रोजी मतदान प्रक्रिया संपेपर्यंत लागू राहील. तथापी हा आदेश सर्व निवडणूक काम काजाशी संबधीत अधिकारी, पोलीस अधिकारी, सुरक्षा पथकातील कर्मचारी, निवडणूक निरिक्षक यांना लागू राहणार नाही. या आदेशाचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास भारतीय नागरिक सुरक्षा न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ नुसार कार्यवाही करण्यात यईल, असे प्रशासनाव्दारे कळविण्यात आले आहे.

# थोडक्यात

## निवडणूक कर्तव्यावरील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या टपाली मतदानास प्रारंभ

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, ठाणे :** १४४-कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघात मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रांवर नियुक्त अधिकारी व कर्मचारी वर्गाच्या टपाली मतदान प्रक्रियेस दिनांक १३ नोव्हेंबरपासून डोंबिवली पूर्वेतील सिस्टर निवेदिता हायस्कुल येथे प्रारंभ झाला. दिनांक १३ नोव्हेंबर व दिनांक १४ नोव्हेंबर या दोन दिवसात निवडणूक कर्तव्यावरील एकूण ३९६ अधिकारी व कर्मचारी यांनी आपला टपाली मतदानाद्वारे आपला मतदानाचा हक्क बजावला.टपाली मतदान करु न शकलेल्या उर्वरित अधिकारी व कर्मचा-यांना दिनांक १७, १८ व १९ नोव्हेंबर २०२४ रोजी तर अत्यावश्यक सेवेतील अधिकारी व कर्मचारी (पोलीस कर्मचारी) यांचेसाठी १५ व १६ नोव्हेंबर रोजी टपाली मतदानाद्वारे आपले मत सावित्रीबाई फुले कलामंदिर, डोंबिवली (पूर्व) येथे सुविधा केंद्रात (ऋ) नोंदविता येणार आहे.

या टपाली मतदान प्रक्रियेत १४४-कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी विश्वास गुजर तसेच सहा.निवडणूक निर्णय अधिकारी श्ध्दा चव्हाण, संजय भोये आणि निवडणूक नायब तहसीलदार सुरेश महाला यांनी टपाली मतदानाद्वारे आपला मतदानाचा हक्क बजाविला.दिनांक १३ नोव्हेंबर रोजी एकूण १७२ अधिकारी कर्मचाऱ्यांनी टपाली मतदान केले.दिनांक १४ नोव्हेंबर रोजी एकूण २२४ अधिकारी कर्मचाऱ्यांनी टपाली मतदान केले.

## महानगरपालिका मुख्यालयातमतदानाचा हक्क बजावण्याची सामूहिक शपथ

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, ठाणे :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ या कालावधीमध्ये मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये मतदानाची टक्केवारी वाढविण्याकरीता विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यानुषंगाने गुरुवार, दिनांक १४ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या मुख्यालयात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ इतएड्ढ अंतर्गत भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त अजय वैद्य यांनी महानगरपालिकेच्या सर्व कर्मचाऱ्यांसह मतदानाचा हक्क बजावण्याची सामूहिक शपथ घेतली.

याप्रसंगी उप-आयुक्त (मुख्यालय) रोहीदास दोरकुळकर, उप-आयुक्त शैलेश दोंदे, सहाय्यक आयुक्त (निवडणूक) नितिन पाटील, सहाय्यक आयुक्त (समाजकल्याण) मिलिंद पळसुले, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.संदिप गाडेकर, अग्निशमन विभाग प्रमुख राजेश पवार, आस्थापना विभाग प्रमुख राजेश गोसावी व महानगरपालिकेचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोकसभा व विधानसभा निवडणुकीत ५५ उमेदवारांवर विविध गुन्हे दाखल

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१४, नांदेड :** नांदेड जिल्हयामध्ये लोकसभा व विधानसभा निवडणुकीत उभे असणाऱ्या १८४ उमेदवारांपैकी ५५ उमेदवारांवर विविध गुन्हे दाखल आहेत. या ५५ उमेदवारांनी निवडणूक पूर्ण होईपर्यंत आपली माहिती वृत्तपत्रातून जनतेला कळविणे आवश्यक आहे. ज्यांनी वृत्तपत्रातून जाहिराती दिल्या नसतील त्यांनी १८ नोव्हेंबर पर्यत द्याव्यात, अशी सूचना खर्च विभागाचे नोडल अधिकारी जनार्दन पक्वाने यांनी केली आहे. भारत निवडणूक आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे सर्व उमेदवारांने त्यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्यास कोणते गुन्हे दाखल आहेत याबाबतची सविस्तर माहिती माध्यमामध्ये निवडणूक उमेदवारी जाहिर झाल्यापासून तर मतदान होईपर्यंत जाहिर करणे अनिवार्य केले आहे. त्यामुळे अशा पार्श्वभूमीच्या उमेदवारांनी मतदारांना माहिती होईल अशा प्रकारे माध्यमामधून एकूण तीन वेळा जाहिराती देवून जनतेला माहिती द्यावी, असे आवाहन निवडणूक आयोगाने केले आहे. यासंदर्भात आयोगाने १५ ऑक्टोबर २०२४ रोजी निर्देश जारी केले आहेत. नांदेड जिल्हयात लोकसभेसाठी १९ तर विधानसभेसाठी ९ मतदारसंघात १६५ उमेदवार उभे आहेत. अशा एकूण १८४ उमेदवारापैकी ५५ उमेदवारांवर गुन्हे दाखल आहेत. या सर्व उमेदवारांना प्रिंट मीडियामध्ये तीन जाहिराती व इलेक्ट्रॉनिक मीडियामध्ये प्रत्येकी ३ जाहिराती प्रकाशित करणे आयोगाने अनिवार्य केले आहे. त्यामुळे आयोगाच्या निर्देशानुसार जाहिराती प्रसारित करण्याचे स्पष्ट केले आहे.

## १८ ते २० नोव्हेंबरपर्यंत ध्वनीक्षेपकांच्या वापरावर निर्बंध



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१४, बुलडाणा :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ चा कार्यक्रम घोषित करण्यात आला असून जिल्ह्यात बुधवार, दि.२० नोव्हेंबर रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान होणार आहे. त्याअनुषंगाने निवडणूक आयोगाने मतदान दिवसाच्या ४८ तास अगोदर करावयाच्या कारवाईबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केले आहे. त्यानुसार ध्वनिक्षेपकाच्या वापराबाबत दि. १८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजेपासून ते दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान प्रक्रिया संपेपर्यंत जिल्ह्यातील ७ ही मतदार संघाच्या क्षेत्रामध्ये निवडणूक प्रचाराचे ध्वनीक्षेपकाच्या वापरावर पूर्णपणे निर्बंध राहिल, असे आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले आहेत.